दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • रविवार दि.९ नोव्हेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक ७९ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Sunday 9 Nov 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 79 • Pages 4 • Rate 4 Rs


## अरे रे माझ्या लाडक्या पोपटाची वाचा गेली

**मुंबई**–उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या भूखंड घोटाळ्यामुळे अवघ्या राज्याचे राजकारण ढवळून निघाले आहे. या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पार्थ यांची पाठराखण केली आहे. पण विविध विषयांवर सातत्याने परखड भूमिका घेणाऱ्या आमदार रोहित पवारांनी मात्र या प्रकरणी अद्याप कोणतीही भूमिका घेतली नाही. त्यामुळे सत्ताधारी शिवसेनेचे मंत्री संजय शिरसाट यांनी त्यांच्यावर उपरोधिक निशाणा साधला आहे. या प्रकरणी त्यांनी रोहित पवारांचा उल्लेख माझा लाडका पोपट असा करत त्याची वाचा गेल्याचे म्हटले आहे.पार्थ पवार हे पुण्यातील १८०० कोटींची महार वतनाची जमीन अवघ्या ३०० कोटींत घेतल्याप्रकरणी अडचणीत सापडलेत. विरोधकांनी या प्रकरणी अजित पवारांवर टीकेची झोड उठवत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

# पार्थ पवार जमीन गैरव्यवहार प्रकरणी देवेंद्र फडणवीस म्हणाले रजिस्ट्री रद्द झाली तरी केसेस हटणार नाहीत

**नागपूर (वृत्तसंस्था)–अजित पवार यांच्या कुटुंबाशी संबंधित जमीन व्यवहार प्रकरणाने मोठं वादळ निर्माण केलं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीकडून १,८०० कोटी रुपये किंमतीची जमीन केवळ ३०० कोटींमध्ये खरेदी करण्यात आली. या व्यवहारामुळे शासनाची सुमारे १५२ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अहवालात जो कोणी दोषी आढळून येईल त्यावर कारवाई होईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले, जी माझ्याकडे माहिती आहे त्यानुसार हा जो काही करार त्यांनी केला होता, त्यात पैशांची देवाण–घेवाण बाकी होती. परंतु, रजिस्ट्री झाली होती. दोन्ही पक्षांनी रजिस्ट्री रद्द करावी, असा अर्ज केला आहे. त्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना जे पैसे भरायचे असतात, कारण रजिस्ट्री रद्द करायची असेल तरी पैसे भरावे लागतात. त्यामुळे तशी नोटीस त्यांना पाठवण्यात आली आहे. त्यामुळे पुढची कारवाई जी होणार आहे ती होईल. तरी देखील जी काही क्रिमिनल केस दाखल झालेली आहे ती याने संपणार नाही. त्या संदर्भातल्या ज्या काही अनियमितता आहेत, त्याला जो कोणी जबाबदार असेल त्याच्यावर पुढची कारवाई होईल, अशी माहिती फडणवीस यांनी दिली आहे.**



पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, यासोबतच आम्ही एक समिती स्थापन केली असून एक महिन्यात अहवाल मागवला आहे. याची किती व्याप्ती आहे, यात कोण कोण आहे याची माहिती घेतली जाणार आहे. या संदर्भात पोलिसांनी देखील कारवाई केली असून दोघांना अटक करण्यात आले आहे. सगळ्या प्रकारची चौकशी केली जाणार आहे, यात कोणालाही सोडले जाणार नाही. जो काही घटनाक्रम समोर येत आहे, त्याच्या तळाशी पोलिस जाण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे याची संपूर्ण माहिती आल्यावरच यावर भाष्य करणे योग्य राहील, असे फडणवीस म्हणाले.तसेच देवेंद्र फडणवीस यांनी अभय दिले असल्याचे बोलले जात आहे. यावर पत्रकारांनी प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, ज्यांना एफआयआर काय असतो हे समजत नाही, असेच लोक अशा प्रकारचा आरोप करू शकतात. एफआयआर दाखल करत असताना ज्या एक्सप्रेस पार्टीज असतात त्यांच्यावर गुन्हा दाखल होतो. यात जी कंपनी आहे, या कंपनीचे जे अधिकृत सिग्नेटरीज आहेत त्यांच्यावरच गुन्हा दाखल होऊ शकतो. पण लक्षात घेतले पाहिजे, ज्यावेळेस एखादा एफआयआर होतो त्यावेळेस ज्यांनी सही केले ते, ज्यांनी विक्री केली ते, ज्यांनी फेरफार केला ते, ज्यांनी चुकीचे रजिस्ट्रेशन केले ते, अशा सगळ्यांवर हा एफआयआर दाखल केलेला असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली आहे.अजित पवारांचा यात संबंध आढळून आल्यास त्यांच्यावर कारवाई होणार का? या प्रश्नावर उत्तर देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, अहवाल येऊ द्या, अहवालात जो कोणी दोषी असेल, जो कोणी आणि माझ्या या मताशी किमान अजित पवार सुद्धा सहमत असतील की या अहवालात कोणीही दोषी आढळला तर कारवाई होईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# विभागीय स्तरावर जीवन शिक्षण शाळा, केजचा डंका!

## खेळाडूंनी गाजवला विजय, राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**



दिनांक ८ नोव्हेंबर २०२५ रोजी मानवत (जि. परभणी) येथे पार पडलेल्या विभागीय मैदानी स्पर्धेत केज येथील जीवन शिक्षण विद्यालयाने उल्लेखनीय कामगिरी नोंदवत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. १४ वर्ष मुलींच्या गटात कु. धनश्री अर्जुन सोनवणे हिने थाळीफेक या प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच १७ वर्ष मुलींच्या गटात कु. पूनम रामेश्वर घुले हिने थाळीफेक मध्ये तृतीय क्रमांक, तर १९ वर्ष मुलींच्या गटात कु. गौरी सचिन उगलमुगले हिने थाळीफेक मध्ये द्वितीय क्रमांक मिळवला.तसेच मुलांच्या गटात चि. अथर्व शिवराज घुले याने १४ वर्ष गोळाफेक मध्ये तृतीय क्रमांक, तर चि. रोनक रणधीर ठोके याने १४ वर्ष २०० मीटर धावणे या प्रकारात तृतीय क्रमांक मिळवत आपला ठसा उमटवला.

या विजयानंतर विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, या सर्व यशामागे क्रीडा मार्गदर्शक श्री. साजेद पठाण सर, भीमाशंकर तोंडसे सर, अश्विनी दळवे मॅडम ,किशोर मस्के सर व धम्मपाल गायकवाड सर यांच्या मार्गदर्शनाचे मोलाचे योगदान राहिले आहे. आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या या खेळाडूंना संस्थेचे सचिव मान. हारूनभाई इनामदार, सहसचिव यासीनभाई इनामदार, मुख्याध्यापक रमाकांत ढाकणे सर, उपमुख्याध्यापक संदीप गुळवे सर, बन्सल क्लासेसचे सहसंचालक गोविंद ठोंबरे सर, मुख्याध्यापक बाळासाहेब ठोंबरे सर यांनी मन:पूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशाने जीवन शिक्षण शाळेचा झेंडा विभागीय पातळीवर अभिमानाने फडकला आहे.

# मनपा उपायुक्तपदी वसुधा फड रुजू

दैनिक वादळ वार्ता

**लातूर । नदीम पटेल**

लातूर शहर महानगरपालिकेच्या उपायुक्त म्हणून वसुधा फड गुरुवारी (दि. ६) रुजू झाल्या. विशेष म्हणजे यापूवीर्ती सहाय्यक आयुक्त म्हणून त्यांनी लातूर येथे काम केलेले आहे. आता पदोन्नतीने त्या लातूर येथे आल्या आहेत.

एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळख असलेल्या वसुधा फड यांची २०१० मध्ये एमपीएससी मार्फत मुख्याधिकारी संवगातून निवड झालेली आहे. त्यांनी यापूर्वी नदिड पालिकेत सहाय्यक आयुक्त, लातूर पालिकेत सहाय्यक आयुक्त, औसा नगरपालिकेत मुख्याधिकारी, गंगाखेड नगरपालिकेत मुख्याधिकारी आणि धाराशिव येथे मुख्याधिकारी म्हणून काम केलेले आहे. आता पदोन्नतीने त्या उपायुक्त म्हणून लातूर येथे रुजू झाल्या आहेत.त्यांनी पदभार स्वीकारला. यावेळी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, सहाय्यक आयुक्त खदीर शेख, पर्यावरण अधिकारी, सन्मती मेस्त्री, स्वच्छता



विभाग प्रमुख, रमाकांत पिडगे, मालमत्ता व्यवस्थापक, शुभम बावने, शिक्षणाधिकारी श्वेता नागणे यांच्यासह सर्व विभाग प्रमुखांनी त्यांचे स्वागत केले.यावेळी सत्काराला उत्तर देताना वसुधा फड यांनी पालिका आयुक्त श्रीमती मानसी मॅडम यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त पदाच्या माध्यमातून लातूर शहरातील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी कार्यरत राहण्याची ग्वाही दिली. लातूर शहराची माहिती असणाऱ्या अधिकारी उपायुक्त म्हणून रुजू झाल्याच्या भावना अधिकारी व विभाग प्रमुखांनी यावेळी व्यक्त केल्या.

# सुशिक्षित तरुणांनी राजकारणात यावे व देश घडवण्यासाठी योगदान दयावे–डॉ.अजय कदम

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

वयाच्या पंचवीस तीस वर्षे होईपर्यंत शिक्षण घ्यायचे . मग नोकरी करायची.मग बायको करायची.ती नोकरदाराला मिळते,मग कसा का असेना मग दोन लेकर,एक घर,एक चार चाकी गाडी वर्षाचे सर्व सणोत्सव साजरे करायचे. ते रंगीत फोटो,रंगीत कपडे,दागिने,हॉटेलमध्ये जेवण हे सर्व सोशल मीडियावर पाठवून आपल्यापेक्षा गरीब असणार्यांना कायम कमी लेखायचे.शेतात काबाड कष्ट करणाऱ्याना कमी लेखायचे.त्यांना अडाणी कमी बुद्धीचे समजायचे. त्यांच्या भाषेवरून. पोशाखावरून, त्यांचे घरदार यावरून कमी लेखायचे.आपण मोठ मोठ्या बारमध्ये जाऊन इंग्लीश दारू गुपचूप दारू प्यायची आणि आपला भाऊ गावी खूप दारू पितो म्हणून त्याची जमीन घ्यायची.त्याला अडचणीत आणायचे.बायकोला आपल्या बापाच्या संपत्ती मध्ये हक्क मागायला लावायचा.त्या पैशावर एक नवीन प्लॉट वा सदनिका विकत घ्यायची. या अशा भंकस जगण्याचे सवपन आपण पाहतो आणि जगतो आणि मरतो.आपल्या जीवनाचे अंतिम ध्येय हे नोकरी मग बायको मग मुले हेच झाले आहे आणि हीच आपली माणूस म्हणून झालेली सर्वात मोठी हार आहे. पराभव आहे.हे बदलायाचे असेल ग्रामीण संस्कृतीला नवजीवन द्यायचे असेल तर या शिकलेल्या आणि नोकरीसाठी बाहेर असणार्यांनी आपली गावी एकदा जायला हवे.ते गाव पाहायला हवे.त्या गावातील परिस्थिती. आणि आणि आपण राहत असलेल्या सोसायटीतील परिस्थती याची तुलना केली पाहिजे.यामध्ये जर आपले गाव समान पातळीवर असेल तर आनंदी आनद आहे मात्र, जर गाव कंगाल असेल. पाण्याची समस्या असेल. रस्ता नसेल.स्मशानभूमी, व्यायामशाळा,वाचनालय,शाळेला मैदान नसेल गावची शाळा मोडकळीस आली असेल.मंदिर आणि सभागृहे काळवंडली असतील आणि त्याच वेळी तुमचा सरपंच, पंचायत समिती ,जिल्हा परिषदसदस्य,आमदार,खासदार मोठमोठ्या महालात राहत असतील आणि करोडो रुपयांच्या गाड्यामंध्ये फिरत असतील तर तुम्हाला लाज वाटली पाहिजे.तुम्ही शिकलेल्या लोकांनी दुर्लक्ष केल्यामुळे हे तुमच्या मायबापंचे हे हाल झाले आहेत.आता स्वातंत्र्याची लढाई करण्याची गरज नाही आहे.तर ग्रामपंचायत ताब्यात आल्यावर लगेच पंचायत समिती ताब्यात घेऊ पाहणाऱ्या आणि प्रचंड कला पैसा जमवून मतदान विकत घेवू पाहणाऱ्या या पांढऱ्या बगळ्यांना रोखावे लागणार आहे.तुमच्या गावातील सौंदर्याला या नतद्रष्टांची नजर लागली आहे.शेतात कामकरणारा तुमचा बाप या लोकांनी रडकुंडीला आणला आहे. त्यांच्या खिशात पैसे कोंबून त्याला स्वाभिमान विकत घेण्याचा प्रयत्न केला जात आहे.त्याच्या सत्यनिष्ठ जगण्याला थट्टेचा विषय बनवले जात आहे.हे थांबायलाच हवे. याची सुरुवात शिकलेल्या पासून होईल.क्रांती सामान्य माणूस करू शकणार नाही तो त्याच्या रोजी रोटीच्याच मागे लागला आहे.त्याला बळ द्यावे लागेल.त्याचा हरवलेला आत्मविश्वास त्याला परत मिळवून द्यावा लागेल.मित्रांनो लढाई मोठी आहे परंतु अशक्य नाही असे विचार डॉ.अजय कदम तालुका प्रवक्ता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार केज यांनी व्यक्त केले आहेत.



# अल्पवयीन तरुणावर केज पोलिस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा नोंद

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील एका खेडेगावातील १७ वर्षीय महाविद्यालयीन तरुणी पोलीस भरतीची तयारी करण्यासाठी मैदानावर गेली असता पाठीमागून तिच्या गावातीलच तिच्या महाविद्यालयातील १७ वर्षीय तरुण तेथे दुचाकी वरून आला व तरुणीच्या हाताला धरून,आय लाईक यु,तु माझ्या सोबत लग्न कर,असे म्हणुन त्याने तिचा विनयभंग केल्या प्रकरणी

अल्पवयीन मुलीच्या फिर्यादीवरून अल्पवयीन तरुणा विरुद्ध केजपोलिस ठाण्यात बालकांचे हक्काचे संरक्षण व विनयभंगाचा गून्हा नोंद झाला आहे.सोमवारी दि. ३ नोव्हेंबर रोजी सकाळी मुलीच्या वडिलांनी तीला पोलीस भरतीची तयारी करण्यासाठी शेजारच्या गावच्या मैदानावर आणुन सोडले.त्याठिकाणी ही मूलगी आपल्या मैत्रिणी सोबत पोलीस भरतीचे प्रशिक्षण घेत असताना तेथे तिच्या गावातील व तिच्याच महाविद्यालयात शिक्षण घेणारा १७वर्षाचा तरुण दुचाकीवरून तेथे आला.तु मला दहावीच्या वर्गात असल्यापासून आवडतेस,असे म्हणुन त्याने त्या मुलीच्या हाताला धरून ओढले व तु माझ्या सोबत लग्न कर, आय लाईक यु असे बोलला.त्यानंतर त्या मुलीने तु मला आवडत नाहीस असे संगितले असता तु जर मला नकार दिलास तर मी तुझ्याबद्दल गावातील मुलांना तुझ्या बद्दल अपप्रचार करून, तुझे करीअर खराब करीन अशी धमकी देऊन तो तेथुन निघुन गेला.या अगोदर ही त्याने अनेक वेळा या मुलीचा पाठलाग केला होता.घडलेला प्रकार मुलीने तिच्या आई, वडिलांना सांगितल्या नंतर पिडीत मुलीच्या फिर्यादीवरून अल्पवयीन असलेल्या १७ वर्षीय तरुणाविरुद्ध केज पोलिसात बालकाच्या हक्काचे संरक्षण व विनयभंगाचा गून्हा नोंद झाला आहे.पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंक पथकाचे प्रमुख पोलीस उप निरीक्षक प्रकाश शेळके हे पुढील तपास करीत आहेत.




# केंद्रीय कृषीमंत्री ना.शिवराजसिंह चौहान यांना चेतन सौंदळे यांच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन

दैनिक वादळ वार्ता

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

सिरसाळा (ता. परळी वैजनाथ) येथे ग्लोबल विकास ट्रस्ट आणि कृषीकुल यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या भव्य शेतकरी मेळाव्यात भारत सरकारचे केंद्रीय कृषीमंत्री मा. शिवराजसिंह चौहान (मामा) यांचे हेलिकॉप्टरने आगमन झाल्यानंतर त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक श्री. मयांक गांधी, श्री.सतीश मुंडे, श्री. राजेश गित्ते, श्री. चेतन सौंदळे, श्री. माऊली (तात्या) गडदे, श्री. जानेमिया कुरेशी यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लिमिटेडचे अध्यक्ष श्री. चेतन सौंदळे यांनी मा. कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर केले या निवेदनात मराठवाडा विभागातील शेतकर्यांच्या



सर्वांगीण विकासासाठी पुढील मागण्या करण्यात आल्या ह्लमराठवाड्यातील नदी–जोड प्रकल्प तात्काळ राबविण्यासाठी शासनाने निधी मंजूर करावा, प्रधानमंत्री कृषी धनधान्य योजना सर्व जिल्ह्यांतील शेतकर्यांपर्यंत पोहोचावी, फळबाग, जलसंधारण, मृदा संधारण आणि जलयुक्त शिवार योजना यासाठी शेतकर्यांना अनुदान मिळावे, शेतरस्ते दुरुस्ती, नियमित वीजपुरवठा आणि हमीभावाने पीक खरेदी यावर शासनाने ठोस भूमिका घ्यावी या मागण्या मंजुर झाल्यास मराठवाड्यातील शेतकरी सशक्त आणि आत्मनिर्भर होण्यास मदत होईल,असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

संपादकीय

## याला जबाबदार कोण?



जेवढ्या जास्त जनतेची अडवणूक करण्याची क्षमता, तेवढी जबाबदारी अधिक. पण, संघटित शक्तीला याचा बऱ्याचदा विसर पडतो. संघटना मोठी असेल आणि अन्य समाजाची अडवणूक करण्याची ताकदही असेल, तर अशा संघटित शक्तीला नेहमीच अधिक चेव येतो. अशा संघटनेचं नेतृत्व किती परिपक्व आणि संयमी आहे, यावर त्या संघटनेची लोकाभिमुखता आणि ओळख ठरत असते. सेंट्रल रेल्वे मजदूर संघाच्या मुंबई शाखेला गुरुवारी याचा नेमका विसर पडला. त्यांनी केलेल्या आंदोलनामुळे झालेल्या प्रवाशांच्या गोंधळात तीन जणांचा हकनाक बळी गेला. सेंट्रल रेल्वे मजदूर संघ ही रेल्वे उद्योगातील कर्मचाऱ्यांची मोठी संघटना. मुंबईचं जीवनचक्र सुरळीत ठेवण्यासाठी मुंबईतली लोकल सेवा किती आवश्यक आहे, याची जाणीव या संघटनेला असणारच. संध्याकाळची, कार्यालयं सुटण्याची वेळ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकात किती प्रचंड गर्दीची असते, एखादी लोकल रद्द झाली तरी किती गोंधळ होतो याची कल्पना या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना नसणार, असं म्हणताच येणार नाही. तरीही या संघटनेने सुमारे तासभर मोटरमन आणि गार्ड यांची वाट अडवून धरली. अप्रत्यक्ष 'रस्ता रोको' केला. ऐन गर्दीच्या वेळी अडवणूक करण्यासाठी, आपली ताकद (खरे तर उपद्रवमूल्य) सिद्ध करण्यासाठी केलेलं हे अनावश्यक अतिरेकी आंदोलन होतं. आंदोलन पूर्वकल्पना देऊन केलं होतं, हे ठीक. पण, त्याची परिणामकारकता रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लक्षात आली नाही, की छुप्या सहानुभूतीपोटी त्यांच्याकडून या आंदोलनाच्या परिणामांकडे दुर्लक्ष झालं? तीन सामान्य प्रवाशांचा बळी गेला असल्याने या आंदोलनाची आणि आंदोलनात प्रत्यक्ष भाग घेतलेल्या आंदोलकांची चौकशी करणं आता 'रेल्वे' ला भाग आहे. आंदोलनाची नोटीस मिळाल्यानंतरही त्याकडे गांभीर्याने न पाहणाऱ्या अधिकाऱ्यांचा समज नक्की काय होता, आंदोलनासाठी त्यांनी दिलेली परवानगी नक्की कोणत्या स्वरूपाची होती, याचीही शहानिशा झाली पाहिजे. दिलेली परवानगी आणि आंदोलनाचं प्रत्यक्ष रूप, कालावधी यात तफावत होती का? असल्यास किती आणि ती नक्की कोणाकडून? याचंही सत्यशोधन झालं पाहिजे.

रेल्वे कर्मचाऱ्यांच्या या आंदोलनाला पार्श्वभूमी होती पाच महिन्यांपूर्वी मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ झालेल्या अपघाताची. धावत्या लोकलमधून पडून त्या अपघातात पाच प्रवाशांचा बळी गेला होता. त्या अपघातातील 'रेल्वे'ची जबाबदारी नक्की करण्यासाठी मुंबईतील व्हीजेटीआय या तंत्र शिक्षण संस्थेकडे रेल्वेनेच काम दिलं होतं. व्हिजेटीआयने दिलेल्या अहवालानुसार, रेल्वे पोलिसांनी दोन अभियंत्यांविरोधात गुन्हे दाखल केले. गुन्हे दाखल करण्याची ही प्रक्रिया रेल्वे कर्मचाऱ्यांना मान्य नाही. तद्वत हे गुन्हे मागे घ्यावेत, अशी त्यांची मागणी होती आणि त्यासाठी गुरुवारचं आंदोलन होतं. म्हणजे, ज्या अपघातात रेल्वे प्रवाशांचे बळी गेले, त्या अपघाताची नक्की केलेली जबाबदारी मान्य नाही म्हणून झालेल्या आंदोलनात आणखी प्रवाशांचे बळी! 'रेल्वे' नेच नेमलेली समिती, त्या समितीने 'रेल्वे'ला दिलेला अहवाल, त्या अहवालानुसार रेल्वे पोलिसांनी दाखल केलेले गुन्हे, ते मान्य नाही, म्हणून रेल्वे कर्मचाऱ्यांचं आंदोलन-आणि त्यात बळी मात्र प्रवाशांचा. अशा प्रवाशांचा, ज्यांचा ना आरोपपत्राशी संबंध, ना त्यांना आंदोलनाशी काही सोयरसुतक. रेल्वे सेवा ठप्प झाली, म्हणून इच्छित स्थळी वेळेत पोहोचण्यासाठी त्यांनी शक्य होतं, ते केलं. रेल्वेतून उतरून पुढचं स्थानक गाठण्यासाठी त्यांनी रेल्वे रुळातून चालायला सुरुवात केली. त्यात त्यांना मागून आलेल्या रेल्वेचा धक्का बसला. काही जखमी झाले, काही मृत्युमुखी पडले. अनेकदा तांत्रिक कारणाने, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते बंद घडवून आणण्यासाठी रेल्वे सेवा ठप्प करतात तेव्हां, पावसाळ्यात रेल्वे मार्गावर पाणी साठतं तेव्हां...अशा अनेकवेळी चालत्या रेल्वेगाडीत असलेल्या प्रवाशांनी किती काळ ठप्प रेल्वेत बसून राहायचं? उतरून आपल्या इच्छित स्थळाच्या दिशेने चालू लागणं हेच त्यांच्या हाती असतं. अशावेळी रेल्वे मार्गातूनच चालावं लागतंच. दुसरा काय इलाज असतो? हे 'रेल्वे'लाही माहीत आहे. किंबहुना अशा आपदस्थितीत महिलांना, वृद्धांना डब्यातून रेल्वे मार्गावर उतरताना त्रास होऊ नये, दुखापत होऊ नये यासाठी काही वर्षांपूर्वी डब्यांना खाली काही पायऱ्यांच्या शिडीची व्यवस्थाही 'रेल्वे'नेच केली आहे. त्यामुळे, सुमारे तासभर रेल्वेसेवा ठप्प झाल्यानंतर आणि त्याबाबतचं कारण अडकून पडलेल्या रेल्वे प्रवाशांपर्यंत पोहोचवण्याची दक्षता न घेतलेल्या 'रेल्वे'ने आता रेल्वे मार्गातून चालताना अपघातात जीव गमावलेल्या निष्पाप जीवांनाच गुन्हेगार ठरवू नये!!मुंबईत माणसाच्या जीवाची किंमत दिवसेंदिवस घसरतेच आहे. सरकारी यंत्रणांच्या लेखी तर माणसाचा जीव हा नुकसानभरपाईची रक्कम (किंवा वाचलाच तर) उपचाराचा खर्च देण्यापुरताच महत्त्वाचा उरला आहे. कोणताही मोठा अपघात झाला, की काही तासात काही रक्कम जाहीर होते. विषय तिथेच संपतो. मुंबई किंवा अन्य कोणत्याही महानगरात नागरिकांना करावा लागणारा प्रवास हेच त्यांचं जीवन आहे. हे जीवन सुरक्षित करण्याला सरकारच्या यंत्रणांचं सर्वाधिक प्राधान्य असलं पाहिजे. ज्या यंत्रणांच्या हाती प्रवासी सेवा येते, त्यांनी प्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित; म्हणजेच शिस्तशीर कसा होईल, यासाठी सतत प्रयत्नशील राहिलं पाहिजे. सेवा हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांना आपल्या जबाबदारीचं भान नसेल, सुरक्षिततेचं महत्त्व त्यांनाच कळत नसेल, त्यांच्या अंगी शिस्त नसेल, तर यंत्रणेत यातले कोणतेच गुण येणार नाहीत. अशा सेवा नागरिकांसाठी निर्धोक राहणार नाहीत. महानगरी जनतेला कायम मृत्यूच्या टांगत्या तलवारीखालीच जगावं लागेल. रेल्वे, पोलीस, रुग्णालय, बस किंवा विमानसेवा या वेगाने वाढणाऱ्या नागरिकरणातील अत्यंत संवेदनशील सेवा आहेत. नागरी जीवनाचा सगळा डोलारा या सेवांवर; पर्यायाने या सेवेतील कर्मचाऱ्यांवर आहे. दुर्दैवाने गेल्या काही वर्षात ही समज लोप पावत चालली आहे. या सेवांवरील अवलंबित्व जसजसं वाढत चाललं आहे, तसतसं आपलं उपद्रवमूल्य वसूल करण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. कर्मचाऱ्यांचे हक्क, त्यांना आपल्या भावना व्यक्त करण्याचा अधिकार असलाच पाहिजे. फक्त त्याला जबाबदारी, संयम आणि विवेकाचं भान असलं पाहिजे. ही अपेक्षा जेवढी कर्मचाऱ्यांकडून आहे, त्यापेक्षा दसपट त्यांच्या नेत्यांकडून आहे. असंघटित प्रवासांचा क्षोभ होतो, तेव्हा काय होतं याचा अनुभव सगळ्यांनाच आहे. त्यामुळे, प्रवाशांच्या जीवाला काही किंमत नाही, असा समज कृपा करून कोणीही होऊ देऊ नये.

# डॉ.अंजलीताई घाडगे सुसंस्कृत राजकारणाची नवी दिशा



शिक्षण, सेवा आणि सुसंस्कृतता यांचा सुंदर संगम म्हणजे डॉ. अंजलीताई घाडगे. उच्चशिक्षित डॉक्टर असूनही, त्यांनी समाजकार्य आणि जनसेवेच्या माध्यमातून केज-अंबाजोगाई तालुक्यात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्याची दिशा आणि विचारांची भूमिका आजच्या गोंगाटमय राजकारणात सुसंस्कृततेचा नवा श्वास देणारी ठरते.

**शिक्षण व प्रेरणादायी कौटुंबिक वारसा**

डॉ. अंजलीताई घाडगे यांचे शिक्षण उच्च पातळीचे असून, त्यांचा कौटुंबिक वारसा सेवाभाव आणि शिस्तीचा आदर्श आहे. वडील शिक्षक, आई नायब तहसीलदार, बहीण डीसीपी, भाऊ उपजिल्हाधिकारी आणि पती आयकर विभागात आयुक्त या उच्च पदांवर कार्यरत आहेत. या सर्व कुटुंबियांच्या कार्यातून मिळालेली शिस्त, सामाजिक बांधिलकी आणि प्रामाणिकपणा यांचे संस्कार त्यांच्या व्यक्तिमत्त्वात ठळकपणे दिसून येतात.

**समाजकार्य आणि राजकीय जाणिवा**

२०१४ पासून डॉ. अंजलीताई सा आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय कोणतेही पद नसतानाही त्यांनी केज-अंबाजोगाई तालुक्यातील विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेतला आहे. समाजातील दुर्बल घटक, महिला आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने काम केले आहे. अनेक उपक्रमांना त्यांनी आर्थिक मदतही केली असून, समाजासाठी कार्य करण्याची त्यांची वृत्ती निस्वार्थ नेतृत्वाचे उदाहरण आहे.

**पाणी फाउंडेशन**

**चळवळीत प्रभावी योगदान**

पर्यावरण संवर्धन आणि जलसंधारण ही त्यांची प्रमुख कार्यक्षेत्रे आहेत. पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी केज-अंबाजोगाई तालुक्यात जलसंधारणाच्या अनेक उपक्रमांना चालना दिली आहे. पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी त्यांनी युवकांना आणि ग्रामस्थांना एकत्र आणून गाव पातळीवर काम केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक गावांमध्ये जलसंधारणाची जागृती निर्माण झाली आहे.

**सुसंस्कृत नेतृत्वाचा आदर्श**

डॉ. अंजलीताई घाडगे यांची शालीनता, मितभाषी स्वभाव आणि सौजन्यपूर्ण वर्तन या गुणांमुळे त्या सुसंस्कृत राजकारणाचे प्रतीक ठरल्या आहेत. राजकारणातही संयम, संस्कार आणि संवाद यांना तेवढेच महत्त्व असते हे त्या आपल्या कृतीतून दाखवतात. त्यांच्या नेतृत्वशैलीत वाद नाही, विचार आहे; स्पर्धा नाही, सेवा आहे.

**भविष्यवेध**

शिक्षण, सेवाभाव आणि सुसंस्कृत दृष्टिकोन या तीन आधारांवर उभे असलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व भविष्यात केज-अंबाजोगाई भागासाठी एक सक्षम नेतृत्व म्हणून उदयास येईल यात शंका नाही. राजकारणाला वैचारिकता, सौजन्य आणि विधायकतेचा स्पर्श देणाऱ्या डॉ. अंजलीताई घाडगे या निश्चितच समाजासाठी प्रेरणादायी ठरतील.

### जगज्जेत्या भारतीय महिला क्रिकेट संघाचे हार्दिक अभिनंदन.!

**बाबा,**
**ह्याचे श्रेय फक्त ,**
**तुझ्याच संविधानाला.!**

कुणाला पचेल अथवा ना रुचेल,
कुणी दुजोरा देतील,
अथवा नाकारतील,
पण सूर्यप्रकाशाइतके,
स्वच्छ सांगायचे तर बाबा,
श्रेय यशाचे, जागतिक पराक्रमाचे,
महिला क्रिकेट संघाचे, ,
आहे तुझ्याच संविधानाला.!

होती अबला,
नव्हता हक्क शिक्षणाचा,
मुक्त वावरण्याचा,
विचार व्यक्त करण्याचा,
कोसो मैल दूर होता खेळ,
स्पर्धात्मक खेळण्याचा,
फकस्त जखडून होती,
चूल अन मुलांच्या जंजाळात.!

होती ती, पिढ्यानपिढ्या,
दबलेली, पिचलेली,
तोंड दाबून,
मुक्याने मार सहन करीत,
जनावरापरी जिवन जगणारी,
दावणीला बांधुन असणारी.!

पण बाबा,
न भूतो, न भविष्यती,
तू प्रथम पेटवलीस,
महिला अधिकारांची वात,
हिंदू कोड बिलाच्या रुपात,
अन करून ठेवलीस तरतूद,
शिक्षणाची, हक्कांची, मतदानाची,
समानतेची, वारसाहक्काची,
अनेकानेक, देशाच्या संविधानात.!

मिळता हक्क, अधिकार,
ती सुटली वेगात, प्रगतीच्या वाटेवर,
सांभाळुन कौटुंबिक अवडंबर,
दाखवून दिली क्षमता वारंवार, निरंतर,
झाली ती, पंतप्रधान, राष्ट्रपती,
इतकेच नव्हे तर,
झेपावली अंतराळावर.!

आता तर नुकतीच,
तिच्या अधिकारांची,
क्षमतेची, झुंजूमुंजू झालीय,
मूलभूत हक्कांना,
कोंब फुटू लागलेय,
तिच्या कक्षा अनेकांगांनी रुंदावताय,
तिला अधिक सिद्ध व्हायचय,
तो दिवस दूर नाही,
जेव्हा ती सार्वभौमत्व मिळवेल.!

तो दिवस दूर नाही,
जेव्हा ती सार्वभौमत्व मिळवेल.!!
तो दिवस दूर नाही,
जेव्हा ती सार्वभौमत्व मिळवेल.!!!

**अरुण निकम.**
**९३२३२४९४८७.मुंबई.**



# महाराष्ट्र आशा व गटप्रवर्क फेडरेशन उखढण च्या अधिवेशनाची रॅली व सभेने सुरुवात

## दोन दिवसीय अधिवेशनात राज्यभरातील २५० आशांचा सहभाग

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

आशांना शासकिय कर्मचाऱ्यांना मिळणारे सर्व लाभ मिळाले पाहिजेत यासाठी आशा व गटप्रवर्क फेडरेशन उखढण सतत लढे आंदोलन करीत आहे. मागणी मान्य होई पर्यंत लढा चालु ठेवण्याचा निर्धार उखढण चे राज्य महासचिव कॉ एच एम शेख यांनी केला आहे. शनिवारी दि ८ रोजी परळी येथील मोंढा मैदानावर झालेल्या सभेत ते बोलत होते.




महाराष्ट्र आशा व गटप्रवर्क फेडरेशन उखढण चे ४ अधिवेशन परळी येथील प्रवचन सभामंडपात झाली. शनिवारी दि ८ रोजी सकाळी दहा वाजता प्रवचन सभामंडप येथुन आशा स्वंसेवीका ची रॅली काढण्यात आली. रॅली मधील आशांच्या हातात लालबावटयाचा झेंडा व मागण्यांच्या गगणभेदी घोषणानी परिसर दणाणून गेला होता. रॅली चा समारोप मोंढा मैदानावरील जाहीर सभेने झाला. यावेळी बोलताना कॉ एच एम शेख यांनी आरोग्य विभागातील महत्वाचा दुवा म्हणुन आशा स्वंसेवीका काम करीत आहेत. कोरोना सारख्या महामारीत प्रत्येक घरोघरी जाण्याचे काम आशांनी केले होते. त्यांना सेवेत कायम करुण शासकिय लाभ मिळाले पाहिजेत. यासह विविध प्रलंबित प्रश्ने सरकारनी सोडवावीत. आशा वर्कर्स यूनियनच्या राज्याध्यक्ष कॉ आनंदी आवघडे, सरचिटणीस कॉ पुष्पा पाटील, सिटु चे स्वगताध्यक्ष सय्यद हनीफ करीम उर्फ बहादुर भाई यांची समायोजित भाषणे झाली. यावेळी व्यासपीठावर माकप चे जेष्ठ नेते कॉ पी एस घाडगे, कॉ अशोक थोरात, कॉ सुवर्णा रेवले यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक सिटु चे जिल्हाध्यक्ष कॉ बी जी खाडे यांनी केले. सुत्रसंचलन बीड जिल्हा आशा वर्कर्स युनियन चे जिल्हा सचिव कॉ किरण सावजी यांनी तर आभारप्रदर्शन जिल्हाध्यक्ष कॉ शिवाजी कुरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आशा लांडगे, हेमा काळे, अनिता गिराम, छाया रणदिवे, सारिका मुंडे, अनिता चाटे, भाग्यश्री थावरे, उमा वाघमारे, भारती राख, सुवर्णमाला मुंडे, जालिंदर गिरी, शेख जावेद, प्रकाश वाघमारे, बाबासाहेब रोडे, शुभम काकडे आदींनी परिश्रम घेतले.

* वैजनाथ मंदिर परिसरातील प्रवचन सभामंडप येथुन रॅलीला सुरुवात
* वैजनाथ मंदिर, सेवालाल महाराज चौक, राणी लक्ष्मीबाई टॉवर मार्गे मोंढा मैदानावर रॅली चे रुपांतर सभेत झाले.
* रॅलीत आशांनी दिलेल्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.
* सर्व आशांनी लाल साडी परिधान केल्याने वेगळेपण दिसत होते.
* भव्य रॅली व गगणभेदी घोषणेनी परिसर दणाणून गेला होता.

# जन्मभर ज्ञान संपादन करण्याकरिता विद्यार्थी म्हणून जीवन जगा-प्रा.प्रदीप रोडे

## वाचाल तर वाचाल वाचनालय व महामानव अभिवादन ग्रुप तर्फे शाळा प्रवेश दिन उत्साहात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

पुस्तकांच्या सहवासात राहून अतिउच्च शिक्षण प्राप्त करणारे घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे महापरिनिर्वाणापर्यंत विद्यार्थी म्हणून जगले व आगाध ज्ञान प्राप्त केले तरी ज्ञानाच्या गुडघाभर पाण्यातच आहे असे उद्गार काढणारे डॉक्टर बाबासाहेबांच्या वाचाल तर वाचाल ह्या अनमोल उपदेशाचे आपल्या जीवनात पालन करणे कसे गरजेचे आहे हे प्राध्यापक प्रदीप रोडे यांनी विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तर रूपात अध्यक्षीय समारोपप्रसंगी संवाद साधताना समजावून सांगितले.

वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालय व महामानव अभिवादन ग्रुप बीड यांच्या संयुक्त विद्यमाने ७ नोव्हेंबर हा दिवस डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिन व विद्यार्थी दिन म्हणून सम्यक सम्म बुद्ध विहार नागोबा गल्ली, बीड येथे विविध उपक्रमांनी संपन्न केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी प्रा. प्रदीप रोडे लाभले होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा कृषी अधीक्षक माननीय सुभाष साळवे, सेवानिवृत्त सीईओ पी. व्ही. बनसोडे, प्रा. डॉ. उपप्राचार्य उत्तमराव साळवे, सेवानिवृत्त शिक्षण अधिकारी सखाराम उजगरे, प्रा. श्रीराम जाधव लाभले होते महामानव ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले, कॅप्टन राजाभाऊ आठवले, प्राचार्य सुशीलकुमार गायकवाड, प्रा. अशोक गायकवाड, डॉक्टर अशोक गायकवाड, समाजसेवक राजु जोगदंड यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.एम. राऊत यांनी तर प्रास्ताविक जी.एम. भोले यांनी केले. सर्वप्रथम तथागत भगवान गौतम बुद्ध यांना पुष्प तर विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुर्तीस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सामूहिक त्रिशरण - पंचशील व बुद्ध वंदना घेण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते ५ जेष्ठ महिलांचा माता रमाई, राष्ट्रमाता जिजाऊ मा साहेब यांच्या जीवन चरित्राची पुस्तके व पुष्पगुच्छ देऊन वाचाल तर वाचाल तर्फे सत्कार करण्यात आला; ज्या मातांनी लौकिक अर्थाने शिक्षण घेतलेले नाही परंतु डॉक्टर बाबासाहेबांच्या शिक्षण घेण्याच्या आवाहनानुसार अनेक हालापेष्टा सहन केल्या व आपल्या पाल्यांना, नातवांना शिक्षणाची कास धरावयास लावली. वाचाल तर वाचाल वाचनालयातर्फे १६ वे केंद्र असलेल्या या विहारात ६ फेरीतील ५० पुस्तकाचा संच विद्यार्थ्यांना वितरित करण्याकरता आयु. बबन जोगदंड यांना मान्यवरांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. या प्रसंगी या संचातील पुस्तकांचा विद्यार्थी व पालकांनी पुरेपूर उपयोग घ्यावा असे नम्र आवाहन विद्यार्थी व पालकांना वाचनालयाचे अध्यक्ष डी.जी. वानखेडे यांनी केले. शाळा प्रवेश दिनाचे व विद्यार्थी दिनाचे औचित्य साधून गरजू व होतकरू विद्यार्थीनी रिंकू जोगदंड वर्ग १० वी या विद्यार्थीनीला फुले, शाहू, आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ, माता रमाई, क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या वैज्ञानिक



दृष्टिकोनाची व स्पर्धा परीक्षा करता उपयोगी १६ पुस्तके पेन कंपास (शालेय साहित्य) देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला व पुढील शिक्षणाकरता शुभेच्छा देण्यात आल्या. दरवर्षी २०१८ सालापासून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिनी एका गरजू व होतकरू विद्यार्थ्यास अशाच प्रकारचे सहाय्य करून उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याकरता वाचाल तर वाचाल वाचनालय मदत करीत असते. कार्यक्रम प्रसंगी प्रा. श्रीराम जाधव उपस्थितांना संबोधितांना म्हणाले की, जगात ज्ञानाचे प्रतीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाकरता घेतलेल्या अपार कष्टाची आठवण विद्यार्थी व पालकांनी सतत केली पाहिजे. ते म्हणाले की, 'बाबा असावे तर रामजी बाबा सारखे' ज्यांनी आपल्या भिवाला शिक्षणाचे व समाजसेवेचे महत्त्व पटवून दिले, याबद्दल सविस्तर विवेचन करून विद्यार्थी व पालकांनी रामजीबाबा व डॉक्टर बाबासाहेबांचा व त्यागमुर्ती रमाईचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जीवनात शिक्षणातून होणाऱ्या शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक बदला करता सदैव तत्पर असले पाहिजे. प्राचार्य सुशीलकुमार गायकवाड व समाजसेवक प्रशांतजी वासनिक यांनी देखील मुलांना मोलाचे मार्गदर्शन करून शाळा प्रवेश दिन का साजरा करावा याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व मान्यवरांचा उपदेश विद्यार्थी एक चित्ताने व शांततेने ऐकत होते. अध्यक्ष समारोपानंतर प्रा. प्रदीप रोडे यांनी मान्यवरांनी दिलेल्या उपदेशावर विद्यार्थ्यांना प्रश्न विचारल्यानंतर अचूक उत्तरे देणारे विद्यार्थी स्वराज सुजित कांबळे इयत्ता चौथी यांनी दोन हजार रुपये बक्षीस मान्यवराकडून मिळविले तर संदीप जयदीप साळवे इयत्ता दुसरी यांनी ३०० रुपये बक्षीस पटकावले. त्यांचे टाळ्यांच्या गजरात मान्यवरांच्या हस्ते बक्षीस व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सव वर्षा निमित्त संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामुदायिक वाचन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिनी मिळालेल्या दानातून मुख्य कार्यक्रमापूर्वी तथागत बुद्ध विहार बलभीम नगर बीड येथे महामानव अभिवादन ग्रुप तर्फे ४४ विद्यार्थ्यांना तर सम्यक सम बुद्ध विहार येथे ५५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन) वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार अडवोकेट तेजस वडमारे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास परिसरातील बहुसंख्य विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती. सरणयतयाने व विद्यार्थ्यांना अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# केज येथे भव्य ग्रामीण कृषी प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी शेतकरी,शालेय विद्यार्थी यांच्या भेटी

## महिलांची कृषी प्रदर्शनात लक्षणीय उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील कृषिधन,शिंजीर मिल्क ण्ड ग्रो प्रोडयुसर कंपनी केज यांच्या वतीने दि.७ ते ९ हे तीन दिवसीय कृषी प्रदर्शन विठाई मंगल कार्यालय येथे सुरू आहे. दुसऱ्या दिवशी कृषी प्रदर्शनात मोठ्या संख्येने व्यावसायिक शेतकरी, विद्यार्थी कृषी प्रदर्शन पाहण्यास आले होते. चाईल्ड प्रायमरी स्कूल, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर या शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले होते.दुसऱ्या दिवशी शाश्वत शेती या विषयावर विनायक पोळ यांचे व्याख्यान संपन्न झाले. यावेळी प्रमुख उपस्थिती प्रा.डॉ.मनोज निगडकर, विकास मिरगणे,डॉ. हनुमंत सौदागर,चाईल्ड प्रायमरी इंग्लिश स्कुलचे शरद गिराम,कंपनीचे संचालक विशाल चौरे, आश्रूबा गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी विनायक पोळ म्हणाले की,शेतकऱ्यांनी शाश्वत शेती साठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करावा लागेल मातीचे आरोग्य सुधारले तरच उत्पादन वाढेल.महिला शेतकऱ्यांनी पुढे येऊन पुढे येऊन नवीन प्रयोग करावे लागतील.जैविक शेती काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ.मनोज निगडकर यांनी करतांना मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाची गरज आहे केज येथे होत असलेले हे कृषी प्रदर्शन याभागातील शेतकरी आणि व्यावसायिकांना वरदान ठरणार असल्याचे मत व्यक्त केले.आभार सोनिया चौरे यांनी मानले. याप्रदर्शनात महाराष्ट्रातील शेतीशी निगडीत आधुनिक तंत्रज्ञान,पाणी व्यवस्थापन,पिक व्यवस्थापन या क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्या सहभागी झाल्या आहेत. केज तालुक्यात पहिल्यांदाच कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याने अनेक शेतकऱ्यांनी,शेतकरी गटांनी कृषी प्रदर्शनास भेटी दिल्या.या प्रदर्शनात शेतकऱ्यांसाठी आधुनिक शेतीतील नवीन तंत्रज्ञान, सेंद्रिय शेतीचे महत्त्व, ठिबक सिंचन पद्धत,ड्रोन फवारणी,ऊस,सोयाबीन, भात,डाळी इत्यादी पिकांची सुधारित वाण यांची माहिती देण्यात आली.तसेच



विविध कृषी यंत्रसामग्री,खत,बियाणे आणि कीड नियंत्रणाचे उपाय यांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.अनेक शेतकरी या प्रदर्शनाला भेट देऊन मार्गदर्शन घेत होते. महिलांसाठी विशेष स्वयं सहायता गटांचे स्टॉल लावण्यात आले होते, ज्यामध्ये घरगुती उद्योग, दुग्धव्यवसाय,शेळीपालन, कुक्कुटपालन इत्यादी विषयांवर माहिती दिली गेली.विद्यार्थ्यांसाठी कृषी मार्गदर्शन सत्रही घेण्यात आले.दुसऱ्या दिवशी संचालक (वैद्यकीय) राज्य कामगार विमा योजना मुंबई डॉ.अशोक थोरात,माजी सभापती दादासाहेब ससाणे यांच्या सह परिसरातील विविध गावातील सरपंच प्रयोग शील शेतकरी यांनीही कृषी प्रदर्शनास भेटी दिल्या.या प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांमध्ये नव्या तंत्रज्ञानाविषयी उत्सुकता निर्माण झाली असल्याचे दिसून आले.शिंजीर मिल्क ण्ड ग्रो प्रोडयुसर कंपनीने पुढाकार घेत या कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे.यामुळे केज तालुक्यातील तसेच बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानसमजून घेण्यासाठी येत आहेत प्रदर्शनामध्ये प्रगत शेती मशिनरी,आधुनिक साधने सुधारीत बीयाणे,खते, किटकनाशके,दुग्ध व्यवसाय या विषयी थेट प्रात्यक्षीके आहेत.हे प्रदर्शन शेतकरी,व्यापारी, विक्रेते, वैज्ञानिक, विदयार्थीयांच्य ासाठी एकव्यासपीठ म्हणुन उपलब्ध आहे.

### ड्रोन प्रात्यक्षिक,ग्राम संस्कृती देखावा ठरले प्रमुख आकर्षण

**कृषी प्रदर्शनात ड्रोन फवारणीचे प्रात्यक्षिक व ग्राम संस्कृती तयार करण्यात आलेला जिवंत देखावा हे कृषी प्रदर्शना तील महत्त्वाचे आकर्षण ठरले या भोवती अनेक विद्यार्थी शेतकरी जिज्ञासु पणे निरीक्षण करताना दिसून आले.**

# सातपुड्यातील सुहासची स्पर्धा परीक्षेत गगनभरारी एसटी प्रवर्गातून राज्यात मिळविला नववा क्रमांक

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

नंदुरबार जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातून आलेल्या एका जिगरबाज तरुणाने आपल्या अथक परिश्रनाच्या बळावर महाराष्ट्राच्या स्पर्धा परीक्षांच्या जगात एक नवा आणि प्रेरणादायी अध्याय लिहिला आहे.

मोलगी परिसरातील सोराचापडा या छोट्या आदिवासी पाड्यावर राहणाऱ्या सुहास धरमसिंग वसावे या तरुणाने अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीतून मार्ग काढत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या राज्यसेवा परीक्षेत एसटी प्रवर्गातून राज्यात नववा क्रमांक मिळवत दैदीप्यमान यश संपादन केले.

त्याची सहाय्यक राज्यकर आयुक्त पदावर नियुक्ती होणार आहे.सुहास वसावेच्या या यशाने सातपुड्याच्या कुशीत आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सुहास वसावे यांचे वडील धरमसिंग वसावे हे कोरडवाहू शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात.वडिलांच्या संघर्षातून प्रेरणा घेत सुहासने आपला शिक्षणाचा प्रवास खडतर परिस्थितीतून पूर्ण केली. त्याने दहावीपर्यंतचे शिक्षण सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय,कन्नड (जि.छत्रपती संभाजीनगर) येथून पूर्ण केले. तर बारावीचे शिक्षण नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा येथील न्यू हायस्कूलमधून घेतले.

**उच्चशिक्षण आणि सुवर्णपदक**

यानंतर जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातून त्यांनी बी.ए.अर्थशास्त्र या विषयात पदवी पूर्ण केली. विशेष म्हणजे या विषयात त्यांनी विद्यापीठात सुवर्णपदक प्राप्त करून आपली शैक्षणिक गुणवत्ता यापूर्वीच सिद्ध केली होती.

**शासकीय सेवेत कार्यरत असतानाही यशाचे शिखर**

२०१५ पासून स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरू करणार्या सुहासने यापूर्वीही आपल्या मेहनतीच्या बळावर शासकीय सेवेत स्थान



मिळवले आहे. २०१७ साली महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत त्यांची उपशिक्षणधिकारी म्हणून निवड झाली होती. २०१८ साली त्यांना सहाय्यक प्रकल्प अधिकारी म्हणून नियुक्ती मिळाली. २०२२ पासून ते प्रकल्प कार्यालय, अहेरी (जि.गडचिरोली) येथे सहाय्यक प्रकल्प अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

**जिल्ह्याचा सन्मान वाढविला**

शासकीय सेवेत कार्यरत असतानाही सुहास वसावे यांनी आपला अभ्यास आणि ध्येय सोडले नाही. प्रशासकीय सेवेत उच्च स्थान मिळवण्याचे त्यांचे स्वप्न होते, जे त्यांनी अथक परिश्रम आणि सातत्याने पूर्ण केले, सातपुड्याच्या कुशीत जन्मलेल्या या हिऱ्याने आता प्रशासकीय सेवेत उच्च स्थान मिळवून आपल्या समाजाचा आणि जिल्ह्याच गौरव वाढवला आहे.

**''बारावीनंतर स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केल्याने परीक्षेचे स्वरूप समजून घेणे आणि परीक्षा पास होण्यासाठी आवश्यक कौशल्ये पदवीच्या शिक्षणात शिकण्याचा प्रयत्न केला. या प्रवासात आदिवासी विकास विभागाच्या वसतिगृहाची महत्त्वाची भूमिका होती. वसतिगृहात स्पर्धा परीक्षेची करणाऱ्या आठ ते दहा मित्रांचा खूप चांगला गट होता. एकमेकांच्या सहकार्याने पहिल्याच प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण होणे शक्य झाले,**

**–सुहास वसावे, गांव सोराचापडा पो.मोलगी ता.अक्कलकुवा**

# व्हाईस ऑफ मीडियाच्या तालुका अध्यक्षपदी इलियास बावाणी यांची निवड



दैनिक वादळ वार्ता
**किनवट । प्रतिनिधी**

व्हॉइस ऑफ मीडिया या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीपजी काळे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष अनिलजी मस्के जिल्हाध्यक्ष गणेशजी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली व्हॉइस मिडीयाचे जिल्हा उपाध्यक्ष विजयजी आमले यांनी व्हाईस ऑफ मीडियाच्या माहूर तालुका अध्यक्षपदी पत्रकार इलियास बावाणी यांची दि ७ ,११, २०२५ रोजी बिनविरोध निवड केली माहूर शहरासह तालुका भरात पत्रकार इलियास बावाणी यांनी आपल्या लेखणीमुळे वेळोवेळी आवाज उठून विविध विकासकामे पार पाडण्यास मोलाची कामगिरी बजावलेली आहे नगरसेवक पदावर असताना त्यांनी मोलाची कामगिरी बजावत शहरात स्वच्छता अभियानाला मान्यवरांच्या सहकार्याने गती देत महास्वच्छता अभियानाचे रूप देऊन माहूर शहराला नावलौकिक मिळवून दिले होते तसेच आपल्या सडेतोड लेखणीतून दुष्ट प्रकारांना आळा घालण्याचे काम सतत २५ वर्षांपासून सेवाभावाने पत्रकारितेच्या माध्यमातून करत आहेत.व्हॉइस ऑफ मीडियाच्या वरिष्ठांनी त्यांच्या कार्याची दखल घेऊन व्हाईस ऑफ मीडियाच्या माहूर तालुकाध्यक्षपदी पत्रकार इलियास बावाणी यांची निवड केल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे व्हाईस ऑफ मीडियाच्या माहूर तालुका अध्यक्षपदी निवड करताना व्हॉइस ऑफ मीडियाचे जिल्हा उपाध्यक्ष विजय आमले जेष्ठ पत्रकार वसंतराव कपाटे नंदकुमार जोशी सर सचिन बेहेरे गजानन कुलकर्णी संजय बनसोडे निखिल कोरडे सादिक भाई किरमाणी शेख रफिक भाई निलेश जयस्वाल वसंतराव राठोड दत्ता जाधव यांचे सह मान्यवर उपस्थित होते.

# पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षणासाठी २५ नोव्हेंबरपर्यंत अर्ज करा

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

एकात्मिक आदिवासी प्रकल्प, राजूर यांच्या मार्फत जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुलांसाठी चार महिन्यांच्या कालावधीचे मोफत पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज २५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, मवेशी (ता. अकोले) येथे सादर करावेत, असे आवाहन प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी केले आहे.हे प्रशिक्षण १ डिसेंबर २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहे. अर्जासोबत १२ वी उत्तीर्ण गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला, आधारकार्ड, रहिवासी दाखला किंवा रेशनकार्ड, डोमिसाईल प्रमाणपत्र आणि चार पासपोर्ट आकाराचे छायाचित्रे जोडणे आवश्यक आहे.उमेदवारांचे वय १८ ते २६ वर्षांदरम्यान असावे. वजन किमान ५० किलो व उंची किमान १६५ सेंमी असावी.निवड प्रक्रियेत शारीरिक क्षमता चाचणी (८०० मीटर धावणे) आणि लेखी परीक्षा प्रत्येकी ५० गुणांच्या असतील. दोन्ही मिळून एकूण १०० गुणांची परीक्षा होईल. उमेदवारांची निवड मेरिटनुसार करण्यात येईल. ऑफलाइन अर्ज केवळ २५ नोव्हेंबर २०२५ पर्यंतच स्वीकारले जातील. त्यांनंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.अर्ज केलेल्या पात्र उमेदवारांनी परीक्षेसाठी दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, मवेशी (ता. अकोले) येथे मूळ व छायांकित कागदपत्रांसह उपस्थित रहावे. अधिक माहितीसाठी ९४२१५२५४१६, ८२७५३४९४१४ अथवा ८८०५६९८९४५ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

### अहमदनगर महाविद्यालयात 'वंदे मातरम' सामूहिक गायनाने देशभक्तीचा सूर गुंजला

# 'वंदे मातरम' गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने अहमदनगर महाविद्यालयात सामूहिक गायनाचा भव्य कार्यक्रम

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

भारताच्या राष्ट्रीय जागृतीचे प्रतीक ठरलेल्या 'वंदे मातरम गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर येथे सामूहिक गायनाचा भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थी विकास मंडळ, आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि राष्ट्रीय छात्र सेना (NCC) यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रीय एकात्मतेचा प्रसार आणि सकारात्मक सामाजिक संदेश देण्याचे उद्दिष्ट या कार्यक्रमामागे ठेवण्यात आले होते. 'वंदे मातरम्' या दोन शब्दांत भारतीय मातृभूमीबद्दलचे अपार प्रेम, निष्ठा आणि अभिमान दडलेला आहे. या गीताचे




रचनाकार बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी आपल्या 'आनंदमठ' या कादंबरीतून हे गीत राष्ट्रभावनेचा स्वर देत प्रकाशित केले होते. ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या स्वातंत्र्यलढ्यात 'वंदे मातरम' हे गीत एक प्रेरणादायी घोष बनले होते. या गीताने असंख्य तरुणांच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित केली, म्हणूनच ते आजही राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक ठरते. या सामूहिक गायन कार्यक्रमाचे आयोजन भा. पां. हिवाळे संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस आणि सचिव विशाल बार्नबस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक आणि सूत्रसंचालन विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. भागवत परकाळ यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. रविकिरण लाटे यांनी मानले.या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य दिलीपकुमार भालसिंग, कायम विनाअनुदानित विभागाचे समन्वयक डॉ. सय्यद रज्जाक, रजिस्ट्रार श्रीमती कल्पलता भिंगारदिवे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. प्रतुल कसोटे, तसेच राष्ट्रीय छात्र सेनेचे समन्वयक डॉ. माधव जाधव उपस्थित होते.कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेनेच्या स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.देशभक्तीचा ओलावा आणि राष्ट्रीय अभिमानाने भारलेले 'वंदे मातरम्'चे स्वर महाविद्यालयाच्या प्रांगणात गुंजले आणि विद्यार्थ्यांमध्ये एकात्मतेचा संदेश पोहोचवला

### वंदे मातरम' सार्धशताब्दी महोत्सव जिल्हा क्रीडा संकुलात उत्साहात साजरा

# अधिकारी,कर्मचारी,विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच नागरिकांनी 'वंदे मातरम' गीताचे सामूहिक गायन केले

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

'वंदे मातरम्' या गीताच्या सार्धशताब्दी महोत्सवानिमित्त जिल्हा क्रीडा संकुल येथे सांस्कृतिक कार्य विभाग, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग तसेच अहिल्यानगर जिल्हा व तालुकास्तरीय 'वंदे मातरम्' सार्धशताब्दी महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य सामूहिक गीतगायनाचे आयोजन करण्यात आले.सर्व उपस्थितांनी एकत्रितपणे संपूर्ण 'वंदे मातरम्' या गीताचे उत्साहात समूहगायन केले. 'वंदे मातरम्' च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमला. कार्यक्रमास महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, उपवनसंरक्षक धर्मवीर साळविठ्ठल, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक,





पोलीस उपअधीक्षक दिलीप टिपरसे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, तहसीलदार संजय शिंदे, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय नाशिकचे सहाय्यक संचालक बाळासाहेब जाधव, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे, तसेच कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त रवीकुमार पंतम आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते ड. आनंद गांधी यांनी आपल्या भाषणातून 'वंदे मातरम्' गीताचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित केले. कै. माणिकराव नरसिंगराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रशिक्षणार्थिनींनी सादर केलेल्या लघुनाटिकेतून देशभक्तीचा प्रभावी संदेश दिला. कार्यक्रमामुळे संपूर्ण जिल्हा क्रीडा संकुल देशभक्तीच्या भावनेने दुमदुमून गेले.प्रास्ताविक भाषणात संस्थेचे प्राचार्य श्री. जहागीरदार यांनी 'वंदे मातरम्' या गीताच्या इतिहासावर प्रकाश टाकला. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

कार्यक्रमास सर्व विभागांतील अधिकारी, कर्मचारी, शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# युवकांनी केला धिरज देशमुख यांचा सत्कार

## जिल्हा बँकांच्या भरतीत भुमिपुत्रांना ७० टक्के जागा राखीव ठेवण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल आभार

**दैनिक वादळ वार्ता**
**लातूर । नदीम पटेल**

स्पर्धा परीक्षांची तयारी करुन नोकरी मिळवणाऱ्या बेरोजगार युवकांची संख्या मोठी आहे. त्या तुलनेत नोकर भरतीमध्ये रिक्त जागांची संख्या खूप कमी आहे. अशा परिस्थितीत राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या नोकर भरतीत स्थानिक जिल्ह्याचे रहिवाशी असलेल्या युवकांना ७० टक्के जागा राखीव ठेवण्यासाठी लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी प्रभावी प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्न ंना यश आल्यानंतर जिल्ह्याचे भूमिपुत्र असलेल्या युवकांना मोठा आनंद झाला. या आनंदातूनच जिल्ह्यातील युवकांनी एकत्र येत गुरुवारी (दि. ६) जिल्हा बँकेत श्री. देशमुख यांचा सत्कार केला.भुमिपुत्रांसाठी केलेल्या प्रभावी प्रयत्नांबद्दल धिरज विलासराव देशमुख यांचे युवकांनी आभारही मानले. काही महिन्यांपासून राज्यातील जिल्हा मध्यवर्ती बँकांतील नोकर भरतीच्या हालचाली सुरु आहेत. काही बँकांनी भरती प्रक्रियेच्या जाहिरातीही प्रसिद्ध केल्या आहेत. लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी एकीकडे लातूर जिल्हा बँकेच्या नोकर भरतीचे नियोजन करत दुसरीकडे या भरतीमध्ये स्थानिक उमेदवारांना संधी मिळावी, यासाठीप्रयत्न केले. जिल्हा बँकेचे कार्यक्षेत्र हे जिल्ह्यापुरते मर्यादित असल्याने या भरतीत जिल्ह्यातील युवकांना मोठ्या प्रमाणात संधी मिळाली पाहिजे, यासाठी त्यांनी राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांना पत्र देऊन पाठपुरावा केला. बाहेरच्या जिल्ह्यातील शेतकरी व संस्थांचा जिल्हा बँकेशी तेवढा संबंध येत नाही. नोकर भरतीमध्ये

थानिक उमेदवारांना प्राधान्य दिले तर त्यांच्याकडून बँकेच्या ग्राहक, सभासद व ठेवीदारांची चांगली सेवा



घडून येईल, ही बाब माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांना पटवून दिली. त्यानंतर सहकारमंत्री पाटील यांच्या पुढाकाराने काही दिवसापूर्वी जिल्हा बँकांच्या भरतीमध्ये स्थानिक जिल्ह्याचे रहिवाशी असलेल्या उमेदवारांसाठी ७० टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला.भरतीत ३० टक्के जागा इतर जिल्ह्यातील रहिवाशी उमेदवारांसाठी राखीव ठेवताना या जागांवरही इतर जिल्ह्यातील उमेदवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास त्या जागांवर स्थानिक जिल्ह्याचे रहिवाशी असलेल्या उमेदवारांना संधी देण्याचाही निर्णय घेतला. याबाबतचा शासन निर्णय बाहेर पडताच राज्यभरातील स्थानिक जिल्ह्याचे रहिवाशी असलेल्या स्पर्धापरीक्षांतून नोकरीचे स्वप्न पाहणाऱ्या युवकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. अशा लातूर जिल्ह्यातील युवकांनी गुरुवारी एकत्र येऊन जिल्हा बँकेच्या मुख्यालयात बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांचा सत्कार केला. तुमच्यामुळेच जिल्हा बँकेच्या भरतीत ७० टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय झाल्याचे सांगत सर्वांनी धिरज विलासराव देशमुख यांचे आभार मानाले.युवक व शेतकऱ्यांच्या मुलांच्या हक्कांसाठी मी शासनाकडे पाठपुरावा केला. शासनालाही माझे म्हणणे पटले आणि जिल्हा बँकांच्या भरतीत स्थानिक रहिवाशी युवकांना ७० टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या. यापुढील काळातही युवक व शेतकऱ्यांच्या मुलांसाठी आपला लढा कायम राहणार आहे, असे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी युवकांना सांगितले.

# केज शहरातील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सभागृहाचे लोकार्पण संपन्न

## कर्तव्यदक्ष नगरसेवक अझहर इनामदार यांच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील क्रांतीनगर परिसरात सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना चालना देणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह शनिवारी दि. ८ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजता मोठ्या उत्साहात लोकार्पण करण्यात आले.

या लोकार्पण सोहळ्याचे उद्घाटन मा.अड.गोरक्षजी लोखंडे (सचिव दर्जा, अनुसूचित जाती-जमाती आयोग,महाराष्ट्र शासन, मुंबई) यांच्या शुभहस्ते झाले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री. रमेशरावजी आडसकर, चेअरमन,अंबा सहकारी साखर कारखाना यांनी भूषविले.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून




राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गटाचे) चे जेष्ठ नेते डॉ.हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड,जेष्ठ समाजसेवक बाबुराव गालफाडे,लहुजी शक्ती सेना महिला जिल्हाध्यक्ष प्रियंका लांडगे,नगरसेवक अझरभाई इनामदार, दलित महासंघ तालुकाध्यक्ष विनायकराव लोंढे,नगरसेवक राजूभाई इनामदार,माजी नगरसेवक महादेव लांडगे, दलितनेते अशोक गायकवाड, आझाद क्रांती सेना तालुकाध्यक्ष शरद थोरात, डॉ.क्षीरसागर तसेच पत्रकार प्रदिप गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

क्रांतीनगर परिसरातील नागरिकांसाठी हे सभागृह सामाजिक,शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी उपयुक्त ठरणार असून,या भागाच्या विकासात हे एक नवे पर्व ठरेल,असे उपस्थित मान्यवरांनी मत व्यक्तकेले.यासभागृहाच्या उभारणीसाठी नगरसेवक अझरभाई इनामदार यांचे पुढाकार महत्त्वाचे ठरले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अशोक शिंदे,धीरज कांबळे, इरफान पठाण,अजय गालफाडे,सय्यद आखिल, अशोक कांबळे तसेच संयोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.या सोहळ्यास क्रांतीनगर परिसरातील नागरिक व विविध समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.आभार प्रदर्शना नंतर कार्यक्रम संपन्न झाला.

# नोबेल सायन्स टॅलेंट सर्च परीक्षा २०२५ मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिसोडा खुर्द शाळेचे यश



**दैनिक वादळ वार्ता**
**भोकरदन । प्रतिनिधी**

ऋषिकेश विठ्ठल सपकाळ इयत्ता ७ वी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिसोडा खुर्दच्या या विद्यार्थ्यांची खडठज अभ्यास दौऱ्यासाठी निवड

सन २०२५ मध्ये नोबेल फाउंडेशन जळगाव आणि भवरलाल अँड कांताबाई फाउंडेशन जळगाव त्यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या नोबेल सायन्स टॅलेंट सर्च परीक्षा २०२५,खडठज अभ्यास दौऱ्यासाठी सदर परीक्षा घेण्यात आली होती, त्यात ऋषिकेश सपकाळ (७वी) निवड झाली त्याबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री विजय जगताप, मुख्याध्यापक श्री विष्णू सपकाळ सर, श्री लोखंडे सर, श्री गोसावी सर, श्री वानखेडे सर, श्री घोरपडे सर आदींनी ऋषिकेश चे अभिनंदन केले

# सौ.सरोजनी दादासाहेब ससाणे यांचा चिंचोलीमाळी जि.प.गटात झंजावात

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेची निवडणूक जस जसी जवळ येईल तसतशी उमेदवारांची धाकधूक वाढली आहे. शिवसेना शिंदे गटाचे केज विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाने व त्यांच्या पत्नी माजी उप सभापती सौ.सरोजनी दादासाहेब ससाणे हे जोमाने चिंचोली माळी सर्कलमधील गावागावांना भेटी देत आहेत. लोकांच्या अडीअडचणी समजून घेऊन सोडवत आहेत. समाजकारण व राजकारणाचा ताळमेळ जोडून गृहभेटीवर जोर दिला आहे. पंचायत समिती, तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन, सिविल हॉस्पिटल, महावीतरण, पंचायत समिती या कार्यालयामध्ये ज्या ज्या लोकांच्या अडी अडचण असतील त्या प्राधान्याने सोडविण्याचे काम ते करत आहेत.या कार्याची पावती म्हणून गावा





गावात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. चिंचोली माळी जि प गटामधील गावागावात त्यांचा दांडगा जन संपर्क आहे. याचा फायदा त्यांना येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये नक्कीच होईल. व वाढता जण संपर्क हा त्यांच्या जमेची बाजू आहे. मतदारांमध्ये त्यांच्याबद्दल सहानुभूतीची लाट निर्माण झाली आहे. तसेच शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा ना श्री एकनाथरावजी शिंदे साहेब, संसद रत्न खासदार श्रीकांत शिंदे साहेब, शिवसेना नेते रामदास भाई कदम, शिवसेनेचे सचिव संजयजी मोरे साहेब, उद्योग मंत्री उदय सामंत साहेब, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट साहेब, मराठवाडा संपर्क प्रमुख माजीमंत्री अर्जुनजी खोतकर, मराठवाडा सचिव अशोकजी पटवर्धन साहेब, संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे साहेब यांच्या आदेशानुसार जिल्हाप्रमुख सचिन मुळुक तालुकाप्रमुख पृथ्वीराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली येत्या जिल्हा परिषद निवडणूक चिंचोली माळी जिल्हा परिषद गटातून सौ. सरोजनी दादासाहेब ससाणे निवडणूक लढवणार आहेत.

# शाळेच्या विकासासाठी पिंपरकणे येथे माजी विद्यार्थी संघाची स्थापना

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

पिंपरकणे, तालुका अकोले, जिल्हा अहिल्यानगर येथील शाळेत माजी विद्यार्थी संघाची भव्य स्थापना करण्यात आली. या शाळेच्या अनेक विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली असून, त्यांनी शाळेच्या विकासासाठी हातभार लावण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला.या संघाच्या माध्यमातून शिक्षण मार्गदर्शन, सामाजिक उपक्रम, आर्थिक सहाय्य आदींसाठी एक भक्कम व्यासपीठ निर्माण केले गेले आहे. यामुळे शाळा, सध्याचे विद्यार्थी, शिक्षक आणि माजी विद्यार्थ्यांमधील सुसंवाद अधिक घट्ट होणार आहे. या संघाचे पहिले अध्यक्ष म्हणून भाऊसाहेब चिंधू पिचड यांची निवड करण्यात आली असून, किसन अमृता पिचड उपाध्यक्षपदी निवडले गेले. शंकर लांडे साहेब



कोषाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळतील तर मुख्याध्यापक श्री विलास सावंत यांची सचिवपदी निवड झाली.

या प्रसंगी माजी विद्यार्थी, ग्रामस्थ, पालक, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांची उत्साही उपस्थिती होती. संघाच्या माध्यमातून शाळेच्या विकासासाठी निधी संकलन, करिअर मार्गदर्शन, आणि विविध सामाजिक उपक्रम राबवण्याची आखणी करण्यात आली. वर्षातून दोन सभा घेण्याचे ठरले असून, पहिली सभा दीपावली सुट्टीत आणि दुसरी हारजी बाबा व गोमाजी बाबा यात्रेच्या काळात आयोजित केली जाईल.

कार्यक्रमाला माननीय मच्छिंद्र भास्कर थिगळे साहेब, यादव पिचड, भावका दादा पिचड, अतुल महादू पिचड, चिंतामण नाना पिचड, हिरामण पांडुरंग पिचड, युवराज रामदास थिगळे, संतोष शंकर पिचड, नवसु कारभारी थिगळे, किरण होनाजी पिचड, निवृत्ती ठकाजी थिगळे, नवनाथ हरी पिचड, ज्ञानदेव बुधा म्हशाळ आदींची उपस्थिती लाभली.या नव्या उपक्रमामुळे शाळेच्या सर्वांगीण विकासाचा नवा अध्याय सुरू होण्याची खात्री सर्वांनी व्यक्त केली.

# बिबट प्रवण क्षेत्रात ऊसतोड करताना विशेष काळजी घेण्याचे आवाहन

**दैनिक वादळ वार्ता । अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या विविध भागांत बिबट्याचा वावर असून सध्या ऊसतोडीचा हंगाम सुरू आहे. त्यामुळे ऊसतोडीच्या वेळी शेतकरी व मजुरांनी आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांनी केले आहे.

ऊसतोड सुरू असताना शेतकरी आणि मजुरांनी आपल्या लहान मुलांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे. अनेकदा मुलांना ऊसतोड सुरू असलेल्या भागातच खेळायला सोडले जाते. अशा वेळी मुलांना ठेवलेल्या ठिकाणी हातात घुंगराची काठी घेऊन एखाद्या मोठ्या व्यक्तीस थांबवावे, जेणेकरून बिबट्या दिसल्यास मुलांची सुरक्षा करता येईल. फार वाकून ऊसतोड करू नये; कारण अशा वेळी दुसरा एखादा प्राणी आहे असे समजून बिबट्याचा पाठमोरा हल्ला होऊ शकतो. ऊसतोड सुरू असताना ट्रॅक्टरवरील टेपरेकॉर्डर किंवा वायरलेस ब्लूटूथ स्पीकरद्वारे मोठ्या आवाजात गाणी लावावीत. यामुळे बिबट्या जवळ येण्याची शक्यता कमी होते. ऊसतोड किंवा शेतीची कामे करताना शक्यतो समूहाने काम करावे. एकट्या व्यक्तीने ऊसतोड किंवा शेतीची कामे करू नयेत. गावाजवळ, जंगलात, शेतात किंवा गावठाण हद्दीत बिबट दिसल्यास बघण्यासाठी गर्दी करू नये. त्यांना दगड मारून पळवण्याचा किंवा मोबाईलवर फोटो काढण्याचा प्रयत्न करू नये. बिबट तसेच त्याची पिल्ले आढळल्यास तात्काळ संबंधित वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# परळी पंचायत समिती येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा घेतला आढावा

## गटविकास अधिकाऱ्यांचे आवाहन: परळी तालुक्यातील ९० ग्रामपंचायतींनी अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी पंचायत समिती येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान संदर्भात आढावा बैठक पार पडली. या बैठकीत परळी तालुक्यातील सर्व ९० ग्रामपंचायतींनी अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन गटविकास अधिकारी शिवाजी मुंडे यांनी केले. बैठकीत अभियानाच्या विविध उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ग्रामपंचायतींनी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी राबवायच्या कृती आराखड्यांवर चर्चा करण्यात आली. गाव समृद्ध झाले तरच राज्याचा सर्वांगीण विकास साधता येणार आहे. यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत परळी पंचायत समिती येथे आढावा बैठक पार पडली. या बैठकीत परळी तालुक्यातील एकूण ९० ग्रामपंचायतींनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा. ग्रामपंचायतींनी स्वच्छता, पाणीपुरवठा, महिला



सक्षमीकरण, डिजिटल ग्रामव्यवस्था, आणि रोजगारनिर्मिती या क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित करावे, असेही त्यांनी नमूद केले. तसेच या अभियानात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. तालुकास्तरावर प्रथम क्रमांकास १५ लाख, द्वितीयास १२ लाख आणि तृतीयास ८ लाख, जिल्हास्तरावर प्रथम ५० लाख, द्वितीय ३० लाख व तृतीय २० लाख, तर राज्यस्तरावर प्रथम क्रमांकास ५ कोटी, द्वितीयास ३ कोटी आणि तृतीयास २ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. तसेच तालुक्यातील ग्रामपंचायत यांना दोन विशेष पुरस्कार ५ लक्ष व ५ लक्ष रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहेत. या अभियानाचे उद्दिष्ट गावागावात सुशासन प्रस्थापित करणे, ग्रामस्थांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे, तसेच विकासासाठी स्पर्धात्मक वातावरण निर्मिती करणे हे आहे. अभियानात पारदर्शक आणि निकोप स्पर्धा ठेवण्यात आली आहे. शाश्वत विकास साधण्यासाठी गावांच्या प्रश्नांचे स्थानिक पातळीवर निराकरण करून, सध्याच्या आणि पुढील पिढ्यांच्या गरजा लक्षात घेऊन विकासाची दिशा ठरविण्याची गरज असल्याचे अधिकारी म्हणाले. या अभियानाचे सात प्रमुख घटक आहेत. सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत, जलसमृद्ध ग्राम, स्वच्छ व हरित गाव, योजनांचे अभिसरण, संस्थांचे सक्षमीकरण, उपजीविका विकास आणि सामाजिक न्याय व लोकसहभाग. बैठकीस पशुधन विकास अधिकारी डॉ. आघाव, विस्तार अधिकारी एस. एम. भताने, तालुका समन्वयक गोदाम तसेच सर्व ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते. यावेळी विस्तार अधिकारी श्री. भताने यांनी अभियानाच्या अंमलबजावणीसंदर्भात सखोल मार्गदर्शन केले, तर गटविकास अधिकारी मुंडे यांनी ग्रामपंचायत स्तरावर सुरु असलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077